


रशियन कॉमेडी ऑफ एरर...
– संतोष मुळे

संस्थापक साने गुरुजी
साप्ताहिक
# साधना
Weekly Sadhana

Date of issue
शनिवार,
१८ मार्च २०२३
मूल्य रु. ४०
(एकूण पृष्ठे : ४८)

## सिरियातून आलेल्या अब्दुलच्या स्वप्नांचं काय होईल?

वैभव वाळुंज




“एके दिवशी अब्दुलला वर्गात यायला उशीर झाला म्हणून ‘तू कशाने आलास’ असं मी विचारलं होतं. तेव्हा मोडक्यातोडक्या इंग्रजीत ‘काही अंतर बोटीने, काही चालत तर काही मिळेल त्या गाडीने’ पार केलं, असं उत्तर त्याने दिलं. आपण समजतो त्यापेक्षा काहींचे प्रवास फारच दूरवरचे असतात. आपल्या प्रश्नांपेक्षा, किंबहुना अस्तित्वापेक्षा त्याची उत्तरं फार दूरच्या पल्ल्याची आहेत असं जाणवलं, आणि मी वरमलो.”

संस्थापक संपादक : साने गुरुजी
Date of issue
१८ मार्च २०२३
वर्ष ७५ / अंक - ३१

संपादक :
**विनोद शिरसाठ**
**सहयोगी संपादक मंडळ :**
अभय टिळक, अतुल देऊळगावकर
मनोहर जाधव, रझिया पटेल

मुखपृष्ठ मांडणी : **गिरीश सहस्रबुद्धे**
व्यवस्थापक आणि अक्षररचना : **सुरेश माने**
मुद्रितशोधन : **विनायक भंडारी**

'साधना' हे साप्ताहिकमालक, साधना ट्रस्ट यांचेसाठी प्रकाशक हेमंत नाईकनवरे यांनी मुद्रक, चंद्रशेखर जोशी, श्री.जे.प्रिंटर्स प्रा.लि. १४१६ सदाशिव पेठ, पुणे ४११०३० येथे छापून, **साधना साप्ताहिक, ४३१ शनिवार पेठ, पुणे ४११०३०.** येथे प्रसिद्ध केले.
**Ph. 020-24451724 / 25 / Mob. 7028257757**
weeklysadhana@gmail.com
www.weeklysadhana.in
**साधना मीडिया सेंटर (पुस्तकविक्री केंद्र)**
Ph.No. : 020-24459635

वार्षिक वर्गणी :
**एक वर्षासाठी : ११०० रुपये**
**दोन वर्षांसाठी : २१०० रुपये**
**तीन वर्षांसाठी : ३००० रुपये**

वर्गणीची रक्कम रोख किंवा/म. ऑ./डी. डी./चेक 'साधना साप्ताहिक' या नावाने काढून, साधना कार्यालयाकडे पाठवावी. किंवा वरील **QR** कोड स्कॅन करून, अथवा साधना साप्ताहिक, बचत खाते क्र.**60025586634, IFSC MAHB 0000001, बँकऑफमहाराष्ट्र,** बाजीराव रोड शाखा, पुणे २ येथे वर्गणीची रक्कम जमा करावी. आणि मग नाव, पत्ता, फोन नं. इत्यादी तपशील साधना कार्यालयाला इ-मेल अथवा फोन करून कळवावेत.

(अंकातील सर्व छायाचित्रे इंटरनेटवरून साभार. अंकात व्यक्त झालेल्या सर्वच मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

# अनुक्रम

**६ आणि आता त्या दोन पदांचेही अवमूल्यन!**
– संपादकीय

**८ सिरियातून आलेल्या अब्दुलच्या स्वप्नांचं काय होईल?**
– वैभव वाळुंज

**११ रशियन कॉमेडी ऑफ एरर..**
– संतोष मुळे

**१४ आत्यंतिक अहंकार : मोदी स्टेडियममध्ये मोदी**
– रामचंद्र गुहा

**१८ सोप्या कामात मी जास्त लक्ष देत नाही!**
– प्रमोद झिंजाडे

**२३ सांस्कृतिक राष्ट्रवाद आणि महिला**
– मनीषा गुप्ते

**२८ निसर्गमग्नांची निर्मिती**
– अतुल देऊळगावकर


**३४ 'अनाहत'मध्ये दार्शनिक कविता आहे!**
– अरूण ठोके

**३८ दोन क्षेत्रांत लक्षणीय काम करणाऱ्याचे आत्मचरित्र**
– अभय दातार

**४१ प्रतिसाद**
बाळकृष्ण शिंदे, विलास पंडित, अरूण वि. कुकडे, प्रल्हाद जायभाये, साधना दधिच, सुकांत चक्रदेव
**आवाहन :** पन्नालाल सुराणा

नवे पुस्तक

अरुण ठोके




# ‘अनाहत’मध्ये दार्शनिक कविता आहे!

कॉपर कॉईन प्रकाशन, दिल्ली
मूल्य २५० रुपये

ज्येष्ठ समीक्षक, कवी दिलीप धोंडगे यांच्या ‘अनाहत’ या कवितासंग्रहातील कविता वेगळ्या जातकुळीच्या आहेत. या संग्रहातील कवितांची मांडणी ‘अविगत’, ‘आहत’ व ‘अनहद’ अशा तीन भागांत करण्यात आलेली आहे. या संग्रहाच्या आरंभी पं.मुकुल शिवपुत्र यांचे ‘आहत’ व ‘अनाहत’ नाद याविषयी विचार देण्यात आलेले आहेत. अनाहत नाद हा कालनिरपेक्ष, शाश्वत असल्याने त्यातून पूर्ण शांती, परम प्रकाशाचा अनुभव अनेकांना येतो, जाणवतो आणि पटतोही असे म्हटलेले आहे. अशा विचारांचा प्रभाव कवीच्या काव्य-व्यक्तिमत्त्वावर असल्याने कवितांतून आत्मलक्षी जाणिवांचे, आत्मसंवादाचे व आधिभौतिक विश्वात रममाण होणाऱ्या मनाचे दर्शन घडते.

‘अनाहत’ या कविता संग्रहातील ‘मी’ लौकिक व्यवहारांपेक्षा अलौकिक व्यवहारांत अधिक रममाण होतो. त्याने निसर्ग घटितांशी, स्वतःच्याच पार्थिवाशी, सखीशी, झोपेशी, आभाळाशी, आभाळाच्या निळाईशी, डोंगराशी, सागराशी, मित्राशी व देवाशीही संवाद केलेला आहे. अशा संवादाच्या अनेक तऱ्हा येथे अनुभवाला येतात. हा संवाद केवळ कवितेतील ‘मी’कडून झाला असता तर तो एकेरी स्वरूपाचा झाला असता. तो तसा न राहता बहुस्तरीय होत अलौकिक पातळीवर पोहोचतो. कवितागत ‘मी’ची सर्जनशील वृत्ती जिवंत ठेवण्याचे महत्कार्य आकाशातील चांदण्या करतात. त्या कवितागत ‘मी’च्या हृदयाच्या चालीवर अंगाईगीत गातात, अशी अनुभूती प्रकट करण्यात आलेली आहे. कवितागत ‘मी’ला आकाशातील चांदण्यांनी गायिलेले अंगाईगीत ऐकू येते. चांदण्यांनी गायिलेले अंगाईगीत म्हणजे अनाहत नाद का? असा प्रश्न जिज्ञासू वाचकाला पडू शकतो. अनाहत नादाची अनुभूती येण्यासाठी अनुभूती घेणारी व्यक्ती सर्जनशील असणे आवश्यक आहे असे म्हणता येईल.

अनाहत नाद नेमका आहे काय? याविषयी बरीच मतभिन्नता आहे. या कवितांतील अनाहत नाद कशा

स्वरूपाचा आहे, हे अभ्यासणे रंजक ठरेल. आचार्य प्रशांत यांनी त्यांच्या यूट्यूब चॅनेलवर संत कबीर यांच्या एक दोह्याचा अर्थ सांगताना म्हटले आहे की, अनाहत नाद ही काही ऐकण्याची गोष्ट नाहीये. आहत ध्वनींनाच तुम्ही ऐकू शकता. आघात होणे म्हणजे आहत होणे होय. जे ऐकले जाऊ शकतात ते ध्वनीच आहत ध्वनी आहेत. कारण ते तुम्हाला आहत करूनच ते तुमच्या इंद्रियांचा विषय बनतात. अनाहत ध्वनी तुम्ही कसे ऐकणार? कान तर ते ऐकू शकत नाहीत कारण कान फक्त कानाच्या पडद्यावर आघात करणाऱ्या ध्वनींना म्हणजेच आहत ध्वनींनाच ऐकू शकतात. मनाने तर तुम्ही अनाहत ध्वनी ऐकू शकत नाहीत कारण मनामध्ये तर फक्त आहत ध्वनींचाच संचय आहे. अनाहत ध्वनींचा तर मनाला पूर्वानुभवच नाहीये. तर तुम्ही अनाहत ध्वनी ऐकले कसे? योग्य तऱ्हेने जीवन जगावे लागते. साधना करावी लागते. खूप कष्ट घ्यावे लागतात. तेव्हा तुम्ही त्या स्थितीत जाऊन पोहोचू शकता.

अनाहत भावातील जगण्याचा अर्थ म्हणजे अहम्‌पासून पूर्णतः मुक्त होणे म्हणजेच अनाहत भावातील जीवन जगणे होय, अनाहत स्थितीतील जगणे होय. म्हणून, अनाहत हा काही ध्वनी इत्यादी नाहीये. तो निरंकारितेच्या जन्माचे नाव आहे. तुमची साधना जेव्हा शिखरावर पोहोचते तेव्हा अहम् ब्रह्मही होऊन जातो. तेव्हा तुम्ही म्हणता की, मला आता साधारण आवाज ऐकू येत नाहीत. मला आवाजांच्या मागचे मौन ऐकू येते. आवाजांच्या मागच्या मौनाचे नाव आहे 'अनाहत'. ते मौन अस्तित्वात आहेच. तुम्हांला ते तेव्हा मिळेल जेव्हा तुम्ही तुमच्या अहंकारापासून मुक्त व्हाल. अनाहतविषयी खूप जिज्ञासा करू नका. 'स्व'विषयी जिज्ञासा करा. तुम्ही अहंकारापासून मुक्त झालात काय? त्या वेळी तुम्हांला जे ऐकू येईल त्याचे नाव अनाहत हे होय.

अहंकारापासून मुक्त झालो नाही तर अनाहत नाद कसा ऐकू येईल? या अर्थाने दिलीप धोंडगे यांच्या कवितेतील कवितागत 'मी'ला अनाहत अवस्थेपर्यंत पोहोचता आले का? तो कबीरांप्रमाणे साधनेच्या शिखरापर्यंत जाऊन पोहोचला का? कवितेत 'स्व'विषयक जिज्ञासा कशी व्यक्त झाली आहे? कवितागत 'मी'ची अहंकारापासून मुक्ती झाली का? या प्रश्नांची उत्तरे शोधणे म्हणजेच अनाहतचे दर्शन घडणे होय. अर्थात ही कविता वाचणारा वाचक दर्शनशास्त्राविषयी अनभिज्ञ असेल तर कंदिलाच्या प्रकाशालाच सूर्य म्हणेल. त्याला कवितेचे प्रचलित अर्थनिर्णयन होईलही परंतु त्यातील दार्शनिकतेचे सौंदर्य आकळणार नाही.

धोंडगे यांच्या कवितेतील कवितागत 'मी'ची 'स्व'विषयक जिज्ञासा म्हणजे ज्याला आपण आत्मशोध म्हणू शकतो तो खास कवीच्या काव्य-व्यक्तिमत्त्वाला असलेल्या अलौकिक ध्यासाचा प्रत्यय म्हणून येतो. त्याचे आभाळाशी, चांदण्यांशी विशेष सख्य आहे. चांदण्यांनी गायिलेल्या अंगाईगीतामुळे आपण स्वप्नात राहतो. स्वप्नात राहिल्यामुळेच आपण सर्जन करतो. आपल्या सर्जनाची कारक शक्ती चांदण्यांच्या अंगाईगीतांतून उमटलेला अनाहत नाद ही आहे. आणि तिचा तुम्हांला सहजी थांगपत्ता लागणार नाही; हे वाचकांना कळावे म्हणून कविता सुरू होण्यापूर्वी दि.पु. चित्रे यांची एक छोटी कविता दिलेली आहे. त्या कवितेच्या अर्थाच्या गूढतेशी धोंडगे यांच्या कवितेचे नाते जुळेलेले आहे. या कवितांत 'मी'च्या अहंकाराच्या पराभवाची नाट्यमयरीत्या कबुली दिलेली आहे.

'शोधतो मी' या कवितेत कवितागत 'मी'चा निसर्ग घटितांशी संवाद होतो. यात दृश्ये आहेत, नाट्य आहे. 'मी'च्या मनोवस्थांची अवस्थांतरे दर्शविणारे कथन आहे. ऐहिक जीवनातील ठेचकाळणाऱ्या अनुभवांनी उदासवाणा झालेला 'मी' जमिनीवर पाठ टेकून झोपल्यावर दुःखी, कष्टी मनोवस्थेमुळे झोपू शकत नाही. सतत जागे राहिल्याने उदासी वाढत जाऊन निद्रानाश, वैफल्य येऊ शकते. परंतु कवितागत 'मी' अशा वेळी अनाहत स्थितीकडे जाण्याचा सफल प्रयत्न करतो. तो आभाळाच्या विशालकाय अवकाशात आपले दुःख पाहतो तेव्हा त्याला त्याच्या दुःखाच्या शूद्रतेची जाणीव होते. त्याने आपल्या झोपेविषयी चांदण्यांना वेड्यासारखे विचारणे, त्याला प्रतिसाद म्हणून कवितेत निर्माण झालेली दृश्यमयता कवितेतील कथननिर्मितीला पूरक ठरते. तसेच चांदण्यांनी कवितेतील 'मी'ला दिलेले साद-पडसाद यांतून रंजक नाट्यमयताही निर्माण होते. एकीने डोळा मिचकावणे, एकीने दात विचकणे, तर एकीने थूः करून पळून जाणे, त्याचे वैतागणे, चांदण्यांचे त्याला खदखदून हसणे, त्याचे रागाने उसळून उताणे होणे, चांदण्यांकडे डोळे वटारून पाहणे आणि शेवटी चुलीतल्या लाकडाप्रमाणे फुरफुरत जळणे, पराजित होऊन हसणे,

यावर पुन्हा चांदण्यांचे प्रसन्न हसणे या साऱ्या कृती कवितेतील 'मी' व चांदण्या या दोन पात्रांच्या गोष्टीतील नाट्याला आकार देणाऱ्या ठरतात. कवितेच्या आरंभी दुःखी, कष्टी असलेला 'मी' कवितेच्या शेवटी गोड झोपेच्या अधीन होतो. यात निद्राभंगातील तडफडणे, ते निद्रासुखात डुंबणे, अशी शोकाकडून सुखकारकतेकडे सरकलेल्या नाट्याची वाटचाल आलेली आहे. यातील लक्षणीयता म्हणून मानवी भाव-भावनांच्या पातळीवर चालणाऱ्या तरल व्यवहारांना टिपणारी संवेदनक्षमता येथे अनुभवाला येते. मानवी वस्तुकरणाच्या काळात निसर्ग घटितांशी सेंद्रिय नाते जपणे, त्यांच्याशी एकरूप होऊन संवादी राहणे, आपल्या सुख-दुःखांत स्वेतरांना असे सामावून घेणे, ही कवितागत 'मी'ने त्याच्या ऐहिक जीवनातील दुःखांपासून दूर पळण्यासाठी शोधलेली क्लृप्ती म्हणूनही पाहता येईल.

या कवितेतील खरा अर्थ मात्र दार्शनिक पातळीवरून प्रत्ययास येतो. कवितेतील 'मी'चे चांदण्यांना रागावणे, त्यांच्याकडे डोळे वटारून पाहणे, त्याच्या या कृतींतून त्याची नकारात्मक वृत्ती व वृथा अहंकार झळकतो. अहंकार सोडतानाची अवस्था चुलीत फुरफुरणाऱ्या लाकडाप्रमाणे झाल्याचे वर्णन शेवटी राख-माती होण्याची प्रक्रिया दर्शविते. ज्या पंचमहाभूतांपासून उद्‌भव त्यातच सामावून जाणे दर्शविले आहे. शेवटी त्याने अहंकार त्यागणे व चांदण्यांकडे बघून पराजित हसणे, हा त्याच्यातील बदल अनाहत अवस्था कशी प्राप्त होते, याचा प्रत्यय देणाऱ्या स्थितीचे सूचन करतो. अहंकार मिटलेला माणूस म्हणजे ठिकाणावर आलेला 'माणूस' इतक्या साध्या शब्दांत तत्त्वज्ञानातील संकल्पनेचा सूचक अर्थबोध करून देण्यात आलेला आहे. कवितेतील 'मी'च्या झोपेत जशा चांदण्या साखर कालवतात तसे कवितेतील सूचकतेतून वाचकांच्या पुढ्यात अलगदपणे अनाहत अवस्थेच्या अनुभूतीची साखर ठेवली जाते. अशा रीतीने या कवितेत व्यंजनेचे व दार्शनिकतेचे तरल संमिश्रण अनुभवाला येते.

कवितेतील 'मी'ची जिज्ञासा त्याला कठोर आत्मपरीक्षणाकडे घेऊन जाते. 'ऋतुबदल' या कवितेत कवितेतील 'मी'ला तृष्णेची भीती वाटते. मानवी जीवनात तृष्णाव्यापाराचे स्थान अढळ आहे. किंबहुना तृष्णा वगळून मानवी जीवनाची कल्पनाही करता येणार नाही. तृष्णाप्राप्तीचा अतिरेक मानवी दुःखाचे कारण ठरतो. म्हणून कवितेतील 'मी'ला तृष्णेविषयीची जिज्ञासा वाटते. 'ऋतुबदल' या कवितेत तृष्णेविषयी त्याला जे वाटते, ऐकू येते, अशा तरल अनुभूतींचे आविष्करण झालेले आहे. कवितेतील 'मी'ने कल्पिलेली तृष्णेशिवायची तटस्थता आणि तृष्णेची अविरत अपरिहार्यता यांमुळे झालेला वैचारिक गुंता त्याच्या चिंतनाचा विषय ठरतो. आपणच तृष्णेला जवळ केल्यामुळे अल्पोल्हासी कृत्यांनी स्वतःचीच झालेली पडझड पाहून तो व्यथित होतो. तृष्णेचा त्याग करणे त्याच्यासाठी व्यथासंपृक्त करणारे ठरते. तृष्णेमुळे सुखावणाऱ्या अहमच्या झडण्याची वाट पाहत तो ऋतुबदलातून मोहरण्याचे स्वप्न पाहतो. परंतु असे स्वप्न पाहणेही सुकर ठरत नाही, याचा प्रत्यय 'भोगवाट' या कवितेतून येतो. अंगभर घुसळण करणाऱ्या तृष्णेला संवेदनशून्य प्रतिसाद देणाऱ्या 'मी'ची दोन रूपे पाहायला मिळतात. तृष्णेचे मूळ नेणिवेत असल्याने ती जाणिवेतील दुःखाचे कारण ठरते, हे सत्य विरक्त 'मी' आसक्त 'मी'ला सांगतो. अशा प्रकारे कवितेतील 'मी'चा 'स्व'शोध हा तृष्णा व दुःखाच्या कारणांचा शोध ठरत असल्याने ही कविता दार्शनिक ठरते. कवितेतील दार्शनिक काव्याभिव्यक्तीचे उदाहरण म्हणून 'कमळण' ही कविता पाहा,

'ही' का 'ती'
ह्या द्वैती तणावात
मी 'ती' लाच निवडले कसे
हे आताशा काहीच उमगत नाही

कदाचित देहगर्भ पौरुष
नि गगनव्यापी वांछित ह्या
मिथुनाचीच ती स्वतांतर्गत

भूल असावी
रक्तजात भूलभुलैयी कमळण (अनाहत)

शरीर व तृष्णेच्या द्वैतात अडकलेला कवितागत 'मी' आपल्या देहरूपातील पौरुषाला तृष्णेच्या आहारी जाण्यासाठी कारणीभूत मानतो. तृष्णेला आपल्यातून वगळणे किंवा तिला बाजूला सारणे हे कठीण कर्म असल्याच्या जाणिवेतून तो तिला रक्तजात 'भूलभुलैयी कमळण' संबोधतो. कवितेतील 'मी' तृष्णेला स्त्रीरूपात

पाहत कमळण म्हणतो. तृष्णेकडे कृतार्थ भावाने पाहतो. हे तृष्णेकडे असे पाहणे त्याला 'स्व'शोधातून उमगले आहे. तिचे असणे त्याच्या 'स्व'शी झुंजणे ठरते म्हणून तो म्हणतो,

"तिच्या माझ्यातल्या
रक्तोन्मिलित अमलाने
जीवद्रव्य विरून
अस्थिपंजर झालो आहे" (अनाहत)

तृष्णेपासून सहजी सुटका करून घेणे शक्य नाही. तृष्णेमुळे अंतर्बाह्य युद्धस्थितीला सामोरे जाणे भाग पडते. शरीरात प्राण असेपर्यंत तृष्णेचा त्याग शक्य नाही. तात्पर्य, तृष्णेला वगळून किंवा तिचा संपूर्ण त्याग करून मानवी जीवनाची कल्पना अशक्यप्राय आहे. हे भान या काव्याशयातून सूचित होते. अनाहत अवस्थेकडे सरकलेल्या व्यक्तीला लौकिक जीवनातील तृष्णेतून सुख मिळण्याऐवजी तो दु:खाचा राजमार्ग वाटतो, असे व्यापक मूल्यभान कवितेतील 'मी'ला 'स्व'शोधातून हाती गवसते.

धोंडगेंच्या कवितेतील 'मी'ची घडण आत्म-संवादातून, अंतर्मुख वृत्तीतून निपजलेल्या कठोर परीक्षणातून झाली आहे. कवितेतील 'मी'चे अमूर्त गोष्टींशी चाललेले संवाद व त्यातून निर्माण झालेले नाट्य हे या कवितेच्या अभिव्यक्तीचे नवल आणि नावीन्यही आहे. याचा प्रत्यय 'मी अभावात' व 'माहात्म्य' या कवितांत येतो. कवितागत 'मी'ला आभाळाच्या व्याप्तीचे, सर्वसमावेशक वृत्तीचे, असीमतेचे, अनंततेचे, गूढतेचे, शांतीचे चिरस्थायी आकर्षण आहे. त्याला आभाळाकडे पाहून आपल्या अहंकाराच्या खुजेपणा त्यागण्याची प्रेरणा मिळते म्हणून तो अहंकाराला त्यागून माणूसपण जपण्यासाठी आभाळाकडे आकृष्ट होतो. आभाळाच्या या काही गुणविशेषांशी साधर्म्य असलेल्या परोपकारी, नि:स्वार्थी, निरंकारी वृत्तीच्या झाडे, नद्या, चंद्र, चांदण्या व रात्र अशा मूर्त-अमूर्त वस्तूरूपांशी 'स्व'चे तादात्मीकरण करून घेतो. धोंडगे यांच्या कवितेतील 'मी'चे नाते वृक्षवल्ली, सगे-सोयरे मानण्याच्या वृत्तीशी आणि 'तुका आभाळाएवढा' कसा झाला या कुतूहलाशी जुळलेले आहे. दुष्काळात तुकोबांनी अंगीकारलेल्या विरक्त वृत्तीकडेही तो आकर्षित झाल्याचे 'अनहद' या विभागातील कवितांतून कळते. अनाहत अवस्थेत पोहोचलेल्या तुकोबांनी विठ्ठलाशी केलेल्या संवादाप्रमाणे एक संवादरूप या कवितासंग्रहाच्या उत्तरार्धात अनुभवाला येते. समकाळात मन उसवणाऱ्या स्थितीत मनाला सांधण्यासाठी संतकवी तुकारामांचे अभंग चैतन्य देतील असा त्याला विश्वास वाटतो. तुकोबांकडून आपल्याला जीवनाचा अर्थ कळला; म्हणून 'रात्रंदिन युद्धा'च्या (आसक्तीच्या) प्रसंगांत राहण्यापेक्षा सत्वर मरणे उत्तम आहे, असे त्याला वाटते. कवितागत 'मी'ची जीवनसाधना अशी शिखरावर पोहोचल्यामुळेच 'बरे झाले देवा। पुसले ते नाव। बरे गेले गाव। अपोआप।।' (पृ.७४) 'बरे झाले देवा। फुटले कपाळ। उरले न भाळ। मिरवाया।।' (पृ.७५) अशी अहंकारशून्यता कबीरांना अपेक्षित असलेल्या अंधाराविरुद्ध (आसक्ती, अज्ञान, दुराचार, आणि आणखी काही...) पेटून उठल्याची भावना कवितेतील 'मी'मध्ये निर्माण झालेली आहे. त्यामुळे त्याच्या मनात वर्तमान परिस्थितीविषयी आक्रोश निर्माण झाल्याचा प्रत्यय या कवितांतून येतो. यामुळेच तो अनाहतकडे आकर्षित झाला आहे. हे होताना त्याने आहत अवस्थाही अनुभवलीय. त्याविषयीच्या अनुभूती 'आहत' विभागातील कवितांत आलेल्या आहेत. त्याने घेतलेल्या 'स्व'शोधातून अहंकाराचा त्याग केल्यामुळेच तो अहंकारमुक्त झाला. म्हणून वाचकांनाही अहंकारमुक्त झाल्याशिवाय अनाहत नाद कसा ऐकू येईल? तो ऐकण्यासाठी प्रत्येकाने आतुर व्हावे परंतु कबीरांच्या मार्गाने जावे, तुकोबांच्या दृष्टीने जीवनाकडे पाहावे अन्यथा अनाहत अनुभवाला येण्याऐवजी आहत होणेच पदरी पडेल, असा दर्शनात्मक इशाराच दिलीप धोंडगे यांची कविता देते. म्हणूनच ही कविता समकालीन मराठी कवितेत अनोखी, अपूर्व वस्तू-निर्माणक्षम प्रज्ञेचा प्रखर प्रत्यय देणारी आहे. कवितेची मुळे आपल्या ज्ञान-परंपरेत रोवणारी आहे, म्हणून एकनाथ पगार यांनी या कवितेला 'विशेष गुणवती कविता' म्हणून गौरवलेले आहे, ते सार्थच आहे.

**डॉ. अरुण ठोके**, नाशिक
Mob. 9175164799